# श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ,

## कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी

## शालेय आंतरवासिता उद्बोधन शिबिर

## स्थळ- लोकसेवा माध्यमिक व उच्चमाध्यमिक विद्यालय, आगळगाव

## दिनांक 5.8.25

---

दिनांक 5.8.25 रोजी आगळगाव येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक लोकसेवा विद्यालय येथे कॉलेज ऑफ एज्युकेशन च्या बी.पी.एड. विभागाने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय क्रीडा उद्बबोधन शिबिराचे आयोजन केले होते.

आगळगाव येथील लोकसेवा विद्यालयात बी.पी.एड. विभागाचे विभाग प्रमुख डॉ.ए.जी.कांबळे, डॉ. एस.एस.सुरवसे, प्रा. पी.पी.नरळे. डॉ. एस.एस.मारकड बी.पी.एड. भाग दोन मधील विद्यार्थी सकाळी 8.30 ला पोहचले. बी.पी.एड. विभागाच्या पाठ मार्गदर्शिका डॉ.एस.एस. सुरवसे यांनी विद्यार्थ्यांना एकत्रित करुन खेळाचे मार्गदर्शनकेले. त्यानंतर विभागप्रमुख डॉ.ए.जी. कांबळे यांनी प्रशिक्षणार्थींना सूचना देऊन शुभेच्छा दिल्या. त्यानंतर बी.पी.एड. विद्यार्थ्यांनी दोरी, टेप, फक्की इ. साहित्याच्या आधारे कबड्डी, खो-खो. गोळाफेक, ताळीफेक, बास्केटबॉल. फुटबॉल, व्हॉलीबॉल, सॉफ्टबॉल, 100 मी. रनिंग इ. खेळांच्यामैदानाचीआखणीकेली.

शाळेच्या प्रार्थनेत तसेच राष्ट्रगीत प्रतिज्ञा या मध्ये सर्व प्रशिक्षणार्थींनी सहभाग घेतला. त्यानंतर बी.पी.एड. विभागाचे विभाग प्रमुख, सर्व प्राध्यापक व प्रशिक्षणार्थी ची शाळेमार्फत स्वागत करण्यात आले. त्या बरोबर बी.पी.एड. विभागताली प्रशिक्षणार्थी शुभ म्घोलप याचा वाढदिवस असल्याने शाळेतील नियमाप्रमाणे त्याला वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

प्रशिक्षणार्थींनी शाळेतली वर्ग मैदानात आणले व विद्यार्थ्यांना मैदान आखणी कशी करावी, तसचे सर्व साहित्याची ओळख करुन दिली. खेळातील विविध कौशल्याचे पाठघेण्यात आले. त्यामध्ये बॉस्केट बॉलमधील चेस पास, फुटबॉल मधील पुश पास, सॉफ्टबॉल मधील पिचिंग, व्हॉलीबॉल मधील अंडरआर्मस सर्व्हीस, कराटे मधील पंच व ब्लॉककिक इ. कौशल्य शिकविण्यातआले. व त्याचा सराव त्यांच्याकडून करुनघेतला.

शालेय व्यवस्थापन समितीने सर्व शिक्षक व प्रशिक्षणार्थींची जेवणाची उत्तम व्यवस्था केली. सर्वांनी उत्तम जेवणाचा आस्वाद घेतला.

पाठाचे काम पूर्ण झाल्यानंतर दूपारच्या सत्रात सामुहिक प्रात्यक्षिकासाठी सर्व मुले व मुली यांना मैदानावर एकत्रित करण्यात आले. त्यावेळेस कराटे याखेळाबद्दल संपूर्ण माहिती सांगून स्वसंरक्षणासाठी कराटे हा खेळ प्रकार खूप महत्वाचा आहे याचे प्रात्यक्षिक बी.पी.एड. प्रशिक्षणार्थी अनिकेत गोडसे, विक्रांत गौड, स्वामीनी डोळसे व दिपाली मदने यांनी प्रत्यक्ष करून दाखविले. यामध्ये फ्रंटकिक, इनसाईड किक, आऊटसाईड किक, फेसपंच, मिडलपंच इ. कौशल्य करुन दाखवून विद्यार्थ्यांकडून सामुहिकरित्या करुन घेण्यात आले. शाळेतील विद्यार्थ्यांनी खूप मनापासून प्रतिसाद दिला. सर्वप्रात्यक्षिकझाल्यानंतरशाळेचेमुख्याध्यापकश्रीचौधरीसरयांनीमनोगतव्यक्तकेले. तसेच सर्व प्रात्यक्षिकांच्या कौशल्याचे निरीक्षण करुन शालेय विद्यार्थी आदर्श कोल्हे व श्रावणीआगले यांनीआपले मनोगत व्यक्त केले. त्यानंतर पाठ विभाग प्रमुख डॉ. एस.एस. सुरवसे यांनी मनोगतात शाळा प्रशासनाचेआभार मानले व शाळा – विद्यार्थ्यांचे मनापासून कौतुक केले.




**प्रार्थनेमध्येसहभागीप्रशिक्षणार्थी**



**मैदानीआखणीकरतानाबी.पी.एड. प्रशिक्षणार्थी**



**कराटेप्रात्यक्षिककरतानाशालेयविद्यार्थी**



**कबड्डीखेळाचेमार्गदर्शनकरतानाबी.पी.एड. प्रशिक्षणार्थी**



**सामुहिककराटेप्रात्यक्षिक**



**गोळाफेकप्रात्यक्षिककरतानाशालेयविद्यार्थी**




**शिबिराचासमारोपकार्यक्रम**